मधुयामिनी स्वप्न (A Midsummer Nights Dream) - पु. रा. लेले

शेक्सपीअरच्या या नाटकावरील आपल्या परीक्षणलेखात, श्री. गो. वा. बापट यांच्या ‘ रोमिओ आणि ज्युलिएट ’ वरील परीक्षणलेखापेक्षा,आपला हेतू निराळा आहे असे श्री. लेले यांनी म्हटले आहे. परंतु संपूर्ण लेख वाचल्यावर असे लक्षात येते की नेमके उद्दिष्ट डोळ्यापुढे मुद्देसूद विवेचन करण्याचेच ते विसरून गेले आहेत. त्यांच्या लेखाच्या शेवटी, रा. लेले यांचे काही काही विचार विषयाला सोडून आहेत ’ असा संपादकांनी शेरा मारलेला आहे.

हॅम्लेट, मॅक्बेथ, ऑथेल्लो, सिंबेलाइन, रोमिओ अँड ज्यूलिएट या नाटकांप्रमाणे, महाराष्ट्रातील लोकांना खूप परिचयाचे असलेले असे प्रस्तुत नाटक नव्हते. श्री. पु. रा. लेले यांचा लेख १९११ सालातील आहे आणि त्यापूर्वी या नाटकाची तीन रूपांतरे मराठीत झालेली होती पण त्यापैकी एकाचाही प्रयोग झाला नसल्याने हे नाटक सर्वसामान्य प्रेक्षकांपर्यंत पोहोचलेले नव्हते. यादृष्टीने या लेखातील निवडक भागाकडे लक्ष वेधणे अगत्याचे ठरते.

आपल्या लेखाच्या सुरुवातीला श्री. लेले यांनी शेक्सपीअरबद्दलचा Hazlitt चा अभिप्राय दिला आहे. - ‘‘ An overstrained enthusiasm is more pardonable with respect to Shakespeare than the want of it for our admiration cannot easily surpass his genius . ’’

Hazlitt चे हे अवतरण द्यावेसे वाटले आहे त्यावरून व पुढे केलेल्या विवेचनावरून श्री. लेले यांचा या नाटककाकडे पाहाण्याचा दृष्टिकोन, त्यांचे मत लक्षात येते. हे नाटक त्यांना अतिशय आवडलेले आहे. ते म्हणतात की, शेक्सपीअरच्या अतिशय मजेदार (pleasant) व पातळ वातावरणात नेणाऱ्या नाटकांपैकी हे एक उत्तम नाटक आहे. (हलक्याफुलक्या वातावरणात, असे त्यांना म्हणावयाचे आहे.) शेक्सपीअरने पूर्ववयात अशीच आनंदप्रधान नाटके लिहिली. या नाटकात पूर्व वयाला शोभणारेच प्रकार खूप आहेत. रडवू शकेल असा

जो भाग आहे व ज्या भागाच्या आधारावर त्याने रोमिओ अँड ज्यूलिएटसारखे नाटक लिहिले आहे, तो भागही थट्टेखोर व विनोदी पद्धतीने लिहिलेला आहे. यात गहन व खिन्न असे काहीही नाही. यातील पात्रे अडचणीत असतानाही हसवतात. यात सर्वत्र Fancy (कल्पने) चा खेळ आहे. हे नाटक आपल्याला एखाद्या रम्य अरण्यात अगर सूक्ष्मतर जगात नेते. यात उत्तमोत्तम Lyric poetry वाचावयास मिळते. या नाटकाच्या स्वरूपाचे असे वर्णन केल्यानंतर श्री. लेले यांतील मुख्य विषयाकडे वळले आहेत. ‘‘ बुद्धीला अतर्क्य अशी प्रेमाची अस्थिरता व अनियंत्रित सत्ता ’’ हा या नाटकाचा विषय आहे असे सांगून त्याचे स्पष्टीकरणही दिले आहे. या नाटकाचे स्वरूप अद्भुतरम्य व मजेदार असल्यामुळे यात स्वभाववर्णनाला फारशी जागा मिळालेली नाही. पण मनुष्य स्वभाववर्णन यात गौण असले व अद्भूत प्रकार पुष्कळ असले तरी मनुष्यस्वभावाच्या विरूद्ध अशी गोष्ट शेक्सपीअरने घडू दिली नाही. हा गुण श्री. लेले यांनी स्पष्ट केला आहे. तीन वर्गांची बेमालूम सांगड घालण्यात संविधानक रचनेचे कौशल्य दिसते असे त्यांचे मत आहे. हे तीन वर्ग असे आहेत -

(१) राजा व त्याच्या भोवतालचे मंडळ, यात चांगल्या रीतिभाती व सुधारणा आढळून येते. पण राजाखेरीज इतरांत थोडासा अहंपणा व त्यामुळे मनाचा कोतेपणा दिसून येतो. त्यांचा प्रयोग चालला असतानाच्या टीकेवरून श्रीमान प्रेक्षक व पगारदार नट यांना बरेच घेण्यासारखे आहे. शेक्सपीअर नट असल्यामुळे त्याला हा भाग सुचला असावा.

(२) बॉटम व त्याचे अशिक्षित स्नेही यांना रीतभात फारशी नाही. यांच्याकडून नवीन नाटक मंडळ्यांना पुष्कळ शिकण्यासारखे आहे.

(३) पऱ्यांचा सूक्ष्म वर्ग - या तीन वर्गांची शेक्सपीअरने इतकी बेमालूम सांगड घातली आहे की, त्यापैकी एकही कमी केल्यास नाटक छिन्नविच्छिन्न होईल. या नाटकात (Development of the plot) संविधानकाची सर्व बाजूंनी वाढ दाखविता येत नाही व तशी फारशी जरूरीही नाही. या तीन वर्गांच्या कुशल जुळणीमुळे, नाटकात नायक कोण ते ठरविता येत नाही असे मत श्री. लेले यांनी दिले आहे.

या नाटकाच्या सुखान्तिकेच्या (कॉमेडी) स्वरूपाची चर्चा श्री. लेले यांनी केली असती आणि सुखान्तिका (किंवा त्यांच्या शब्दात आनंदपर्यवसायी नाटक) लिहिण्यात शेक्सपीअर

कसा यशस्वी झाला आहे हे विस्तृतपणे दाखविले असते तर हा लेख अधिक भारदस्त व मूलग्राही स्वरूपाचा झाला असता. पण दोन-तीन मुद्यांचे थोडेफार विवेचन व इतर भाग विषयाला सोडून, असे हे लेखन झाल्यामुळे, लेखाचे महत्व काही प्रमाणात तरी उणावलेले आहे.

शेक्सपीअरची शोकरसपूर्ण नाटके - रामकृष्ण वासुदेव बर्वे

मुळातील हे भाषण, ‘ नाट्यविषयक चर्चा ’ या शीर्षकाखालील मजकुरात संपादकांनी छापलेले आहे. हा काही केवळ परीक्षणात्मक लेख नव्हे. तरीही १९०८ साली शोकरसात्मक नाटकाच्या संकल्पनेविषयीचा विचार मांडणे, पौर्वात्य व पाश्चात्य नाट्यप्रकृतीसंबंधी तुलनात्मक विवेचन करणे आणि शेक्सपीअरच्या शोकान्त नाटकांचे समीक्षण करणे हे सारे महत्त्वाचे होते. एखाद्याच नाट्यकृतीचे सांगोपांग परीक्षण न करता, शेक्सपीअरच्या टॅज्रेडीज व त्यावरील टीका वाचून जे विचार मनात आले ते या ठिकाणी मांडले आहेत. ते मौलिक असल्याने या लेखाचा या प्रकरणात अंतर्भाव केला आहे.

श्री. बर्वे म्हणतात की टॅज्रेडी व कॉमेडी या इंग्रजी शब्दांचे अर्थ मराठीमध्ये शोकपर्यवसायी व आनंदपर्यवसायी नाटके या शब्दांनी दर्शविले जातात. परंतु ते कितपत बरोबर आहेत हा एक प्रश्न आहे. त्यांनी प्रो. डम्उडन यांची यासंबंधीची व्याख्या सांगितली आहे. -

> ‘‘ Every embodyment of thought of passion or of will which passes considerably beyond the normal standard is tragic or contains with tragic element. All embodyments of thought passion and volition which fall considerably below the normal standard are comic or contain possible comic element. "

प्रो. डम्ऊडन यांच्या व्याख्येच्या आधारे श्री. बर्वे म्हणतात की, नाटकाच्या पर्यवसानावरून टेज्रेडी किंवा कॉमेडी हे नाव त्याला योग्य ठरणार नाही. पर्यवसान हा महत्त्वाचा मुद्दा नाही. तर नाटकातील रस, मनोविकारांचे आविष्करण हे महत्त्वाचे आहे. ‘

टॅजेडी ’ व ‘ कॉमेडी ’ या शब्दांना त्यांनी ‘ करूणरसपूर्ण ’ व ‘ हास्यरसपूर्ण ’ हे शब्द सुचविले आहेत.

डम्उडनच्या व्याख्येच्या आधारे हे विवेचन करीत असताना रससिद्धान्त आणि नाट्यशास्त्रातील संकेत यांचे भान सुटलेले नाही, ही गोष्ट ध्यानात घेण्याजोगी आहे. नाटक आनंदपर्यवसायीच असले पाहिजे असा नियम नाट्यशास्त्रात घातला गेला कारण संस्कृत नाटके ही उत्सवाच्या किंवा यात्रेच्या प्रसंगी मनोरंजनार्थ केली जात होती हे होते. असे स्पष्टीकरण दिले आहे. नाटक हे संसाराचे चित्र आहे व लोकशिक्षण हा त्याचा हेतू आहे ही कल्पना पुढील काळातील आहे आणि त्यानुसार शोकपर्यवसायी नाटके होणे जरूरीचे आहे. कारण माणसाला सुखापासून जितके शिक्षण मिळते तितकेच दु:खापासूनही मिळते.

शेक्सपीअरच्या वेळीही नाटकाचे विषय, रचना यासंबंधी नियम झाले होते, परंतु त्याने त्यांचे अक्षरश: अनुकरण केले नाही. त्याने असे केले नाही तेच योग्य होते, त्याच्या प्रतिभासंपन्नतेची ती खूण होती. हा महत्वाचा विचार श्री. बर्वे यांनी मांडला आहे. संस्कृत व मराठी नाटकांमध्ये परंपरेचा कित्ता गिरविला गेल्यामुळे ठराविक साच्याची निर्मिती झाली हे सत्य स्पष्टपणे त्यांनी सांगितले ही गोष्टसुद्धा महत्त्वाची आहे. आपल्याच नाट्यकृतींचे आपणच अंतर्मुख होऊन परीक्षण करण्याची, दोष व मर्यादाही ध्यानात घेण्याची प्रक्रिया येथे सुरू झाली. अशाप्रकारची चिकित्सा होणे आपल्या नाट्यकृतींच्या विकासाच्यादृष्टीने आवश्यकच होते. शेक्सपीअरची नाटके आणि पाश्चात्य नाट्यसंकल्पना यांची विशाल व्याप्ती नजरेपुढे आल्यावर आपले नाट्यविचार व नाट्यनिर्मिती बदलावी असे वाटू लागले. शेक्सपीअरच्या नाटकांतील सर्व प्रकारचे वैचित्र्य मोह घालू लागले. त्याच्या नाटकांतील ठळक वैशिष्ट्ये सांगून त्याच्या कल्पनाशक्तीचे वेगळेपण कोणते तेही श्री. बर्वे यांनी सांगितलेले आहे. त्याची कल्पनाशक्ती विशाल व सर्वगामी असल्यामुळे सर्व तऱ्हेच्या माणसांचे हृद्गत त्याने आपलेसे केले आहे. नायिकांपेक्षा नायकांच्या अंत:करणाचे पृथक्करण करण्यात त्याने विशेष कौशल्य दाखविले आहे. त्याच्या गाजलेल्या टॅजेडींची नावेही लिअर, ऑथेल्लो, हॅम्लेट, कोरिओलेनस अशी आहेत.

हॅम्लेटच्या व्यक्तिचित्रणाचे, श्री. बर्वे यांनी तपशीलवार विवेचन केले आहे व त्यावरून To hold the mirror up to nature हेच शेक्सपीअरचे ध्येय होते असे प्रतिपादन केले आहे. त्याच्या नाटकात भुतेखेते असतात, त्यासंबंधीही विवेचन केले आहे. नायकांच्या

विशिष्ट प्रकारच्या मन:स्थितीत ही भुते त्यांना रंगमंचावर आणली आहेत. हा विचार येथे मांडला आहे. शेक्सपीअरने आपल्या नायकांची जी मानसशास्त्रीय हाताळणी केली त्या दिशेने जाणारे हे विवेचन आहे, मात्र तशा प्रकारचा स्पष्ट उल्लेख श्री. बर्वे यांनी केलेला नाही. श्री. बर्वे यांच्या एकूण विवेचनाला पाश्चात्य समीक्षकांच्या लेखनाचा – विशेषत: डम्ऊडनचा आधार आहे हे लक्षात येते पण तरीही पौर्वात्य व पाश्चात्य नाट्यनिर्मितीची तुलना करून, एक व्यापक दृष्टिकोन ठेवून त्यांनी आपले जे विचार व्यक्त केले त्यामुळे शेक्सपीअरच्या नाटकांच्या अभ्यासाला मदत झाली आहे.